१८. अम्मीची माया

• वाचा.



जना व सलमा या दोघींची खूप मैत्री होती. त्या दोघी एकाच वर्गात शिकत होत्या. त्या दोघींना एकमेकींशिवाय करमत नसे. सलमाचे घर शाळेच्या रस्त्यावरच होते. एके दिवशी सकाळपासून खूप पाऊस पडत होता. पावसाचे पाणी रस्त्यावर जागोजागी साचले होते. पाऊस थांबल्यावर शाळेत जाताना जना सलमाच्या घराकडे निघाली; पण पावसामुळे सर्वत्र चिखल झाला होता. चालता चालता जनाचा पाय घसरला व ती पडली. तिचा गणवेश चिखलाने भरला. दप्तरही चिखलाने भरले. शाळा भरण्याची वेळ झाली होती. ती घाबरून रडू लागली. ती रडत रडत सलमाच्या घरापर्यंत आली.

सलमा जनाची वाटच पाहत होती. सलमाची आईही दारात उभी होती. तिने जनाचे चिखलाने माखलेले कपडे पाहिले. जनाला त्या दोघींना पाहून आणखीन रडायला आले. सलमा धावत आली. सलमाने जनाला विचारले, ''तुला कुठे लागलं तर नाही ना?'' जना म्हणाली, ''नाही गं, पण माझा गणवेश चिखलानं भरलाय, मी कशी शाळेत येऊ?'' अम्मी जवळ येऊन म्हणाली, ''जना, घाबरू नकोस. लागलं तर नाही ना तुला? तुझा गणवेशच खराब झाला ना! होऊ दे. आपण दुसरा घालू.'' ''अम्मी मला थोडं पाणी द्या. मी तो धुऊन घेते व घालते.'' जना म्हणाली.

अम्मीने जनाच्या तोंडाकडे पाहिले. क्षणभर तिला त्या जागी सलमा दिसली.

''जना जरा थांब,'' म्हणून सलमाची आई घरात गेली. सलमाचा दुसरा गणवेश घेऊन आली व म्हणाली, ''जना, हा चिखलानं भरलेला गणवेश बदल. हा सलमाचा दुसरा गणवेश आहे, हा तू घाल. तुझं दप्तरही साफ करून देते.'' तिने जनाला गणवेश घालायला दिला. तिला प्यायला पाणी दिले. सलमा व जना दोघी शाळेत गेल्या.



शाळा सुटल्यावर दोघी घरी आल्या. जना म्हणाली, ''अम्मी, तुम्ही सलमाचा गणवेश मला घालायला दिला, म्हणून मी दिवसभर शाळेत बसू शकले. अम्मी, माझा गणवेश द्या. उद्या शाळेत येताना सलमाचा गणवेश धुऊन घेऊन येते.''

अम्मी घरात गेली. धुऊन वाळवून घडी घालून ठेवलेला जनाचा गणवेश अम्मीने आणला व जनाच्या हातात दिला. जना अम्मीकडे आश्चर्याने पाहतच राहिली.

स्वाध्याय

प्र. १. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(अ) जनाचा गणवेश कशाने भरला होता?

(आ) जनाला रडायला का आले?

(इ) चिखलाने भरलेले कपडे पाहून अम्मीने काय केले?

(ई) जना अम्मीकडे आश्चर्याने का पाहत राहिली?


प्र. २. कपडे चिखलाने भरलेले असताना जना तुमच्या घरी आली असती, तर तुम्ही काय केले असते?

प्र. ३. तुम्ही अनुभवलेल्या पावसाळ्यातील पहिल्या दिवसाचे वर्णन करा.

प्र. ४. पावसाच्या कविता मिळवा व त्यांचा संग्रह करा.

- **खेळत खेळत वाचूया !**

सोंगटी टाका – पुढे चला.



शिक्षकांसाठी : खेळ कसा खेळावा, हे विद्यार्थ्यांना सांगावे. एक या घरापासून खेळ खेळायला सुरुवात करावी. कॅरमची एक सोंगटी घ्यावी. सोंगटीच्या एका बाजूला लाल रंग, तर दुसऱ्या बाजूला हिरवा रंग द्यावा. लाल रंग पडला, तर एक घर पुढे जावे. हिरवा रंग पडला, तर दोन घरे पुढे जावे. खेळता खेळता शिडी आली, तर ती चढून वरच्या टोकाच्या घरात जावे. तेथील संदेश वाचावा. तेथे विद्यार्थ्यांना बक्षीस मिळेल. सापाचे तोंड असलेल्या घरात सोंगटी आली, तर तेथील संदेश वाचावा. सापाच्या तोंडातून त्याची शेपटी असलेल्या घरात जावे. याप्रमाणे जो शेवटच्या घरात लवकर पोहचेल तो विजयी. गटागटांत हा खेळ घ्यावा. प्रत्येक गटाला एक-एक सोंगटी द्यावी. पुस्तकातील हे पृष्ठ उघडून खेळण्यास सांगावे.